महाराष्ट्र शासन
सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,पुणे शहर यांचे कार्यालय
साखर संकुल,शिवाजीनगर,पुणे-४११ ००५.

जा.क्र.जिउनिपुश/गृहनि/मानीव हस्तां./सन २०२६/१५४ दिनांक:-१०/०४/२०२६.

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे,त्यांची विक्री,व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)अधिनियम १९६३ च्या कलम ११(३) अन्वये चे अभिहस्तांतरणपत्र

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.४६२/२०२३.

राधा वल्लभ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
पत्ता: सिटीएस.नं.३९७,नारायण पेठ,पुणे-३० तर्फे,
तर्फे,
अध्यक्ष,श्री.मंदार रामचंद्र कांरडे,
सचिव,सौ.प्रतिभा दत्तात्रय भरगुडे. -------**अर्जदार.**

विरुध्द

१.मे.पंचशील कन्स्ट्रक्शन कंपनी(पार्टनरशिप फर्म) तर्फे पार्टनरर्स,
i) श्री.शेखर के.गांधी,ii) श्री.अशोक चंदुलाल गांधी,iii) श्रीमती.पुष्पा चंदुलाल गांधी,
iv) श्री.अरविंद मोतीचंद शहा,v)श्री.प्रदिप किवलकर,vi) सौ.प्राजक्ता प्रदिप किवलकर,
vii) श्रीमती.मीरा अशोककुमार कामदार,
ऑफीस पत्ता:-९बी,अंबर चेंबर्स,तिसरा मजला,२८ए,बुधवार पेठ,पुणे-०२.
२.श्री.राधावल्लभ जनार्दन गणेश मंदिर प्रा.ट्रस्ट तर्फे ट्रस्टी आणि वहिवाटदार.
श्री.विद्याधर श्रीधर नगरकर,पत्ता:-सिटीएस नं.३९७,नारायण पेठ,पुणे-३०.
३.श्री.मुकुंद श्रीधर नगरकर,पत्ता:-सिटीएस नं.४१३,नगरकर,
अपार्टमेंट,मुंजोबाचा बोळ,नारायण पेठ,पुणे-३०.
४.जयश्री विद्याधर नगरकर, पत्ता:-सिटीएस नं.४१२,राधा वल्लभ सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
मुंजोबाचा बोळ,नारायण पेठ,पुणे-३०.
५.शुभदा विद्याधर नगरकर.(लग्नापुर्वीचे नाव)शुभदा बोडस (लग्नानंतरचे नाव).
पत्ता:-सिटीएस नं.४१२,राधा वल्लभ सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
मुंजोबाचा बोळ,नारायण पेठ,पुणे-३०. -------**गैरअर्जदार/जमिनमालक.**



वाचले :-

१. महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांचे विक्री,व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३)व नियम १९६४ मधील नियम '९'.
२. महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक माहस. २००८/प्र.क्र.१७० /दु व पु-२ दिनांक २७/९/२०१०.
३. महाराष्ट्र शासन,सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. सगृयो-२०१७/ प्र.क्रं.१९२/१४-स, दिनांक २२/६/२०१८.
४. मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील रिट पिटीशन क्रं.८५४०/२०२४ मधील दिनांक ०६/०३/२०२६ रोजीचे आदेश.

-:प्रस्तावना:-

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांचे विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ पोटकलम (३) अन्वये आणि लागू असलेल्या नियमान्वये अर्जदाराने प्रवर्तकांच्या /प्रतिपक्षाच्या विरुध्द अर्ज क्रं. ४६२/२०२३ दाखल केला होता . सदर अर्जावर या कार्यालयाने वेळोवेळी सुनावणी घेवून सुनावणीअंती दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे आदेशानुसार अर्जदार संस्थेस पुणे महानगरपालिकेचे दिनांक **१४/०९/१९८८** रोजीचे मंजूर नकाशानुसार अर्जदार संस्थेस **२७८.८४ चौ. मी.** इतके क्षेत्रफळ

व या जमिनीमध्ये बांधण्यात आलेल्या **६३३.३७** चौ.मी. बांधकाम क्षेत्राचे अभिहस्तांतरण करणेबाबत आदेश पारीत केला होता. तथापि या कार्यालयाने पारीत केलेल्या दि.०३/१०/२०२५ रोजीच्या 'मानीव अभिहस्तांतरण' आदेशाविरुध्द अर्जदार संस्थेने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन क्र.५६६/२०२६ दाखल केले होते. मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी सदर रिट पिटीशन क्र. ५६६/२०२६ मध्ये दि.१७/०३/२०२६ पुढीलप्रमाणे आदेश पारीत केले आहे.

"१०. Hence, the following order is passed.

i. The impugned judgment and order passed by the competent authority is quashed and set aside to the extent it rejects the balance portion of the land.

ii. The authority under the Act shall, within four weeks from today, issue a fresh certificate granting unilateral deemed conveyance of the entire land admeasuring ३२०.९९ sq. meters along with built up area admeasuring ७३०.९४ sq. meters.

११. The writ petition stands disposed of in the above terms.

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रं.४६२/२०२३ मध्ये खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

-:आदेश:-

राधा वल्लभ सहकारी गृहरचना संस्था मर्या. नोंदणी क्र. **पीएनए/ पीएनए(१)/ एचएसजी/ (टिसी)/११७२६ /सन २०१२-२०१३, दिनांक २५/०४/२०१२** या संस्थेने दाखल केलेल्या प्रस्तुत मानीव अभिहस्तांतरण अर्ज प्रकरणी पुणे महानगरपालिकेचे दिनांक **१४/०९/१९८८** चे मंजूर नकाशानुसार, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत {त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांचे विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करणे बाबत} अधिनियम १९६३ चे कलम ११ {३} अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, संजय राऊत, सक्षम प्राधिकारी तथा, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर,पुणे, याव्दारे, अर्जदार यांनी दाखल केलेला मानीव हस्तांतरण अर्ज क्रं. **४६२/२०२३** हा एकपक्षीय मानीव अभिहस्तांतरणपत्र देण्यासाठी आणि ते नोंदणीकृत असण्याचा हक्क असलेबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील रिट पिटीशन क्रं. ५६६/२०२६ मधील दिनांक १७/०३/२०२६ रोजीचे आदेशानुसार अर्जदार संस्थेस **एकुण क्षेत्रफळ** ३६७.८४ **चौ.मी. पैकी ३२०.९९चौ.मी.** इतके क्षेत्रफळ व या जमिनीमध्ये बांधण्यात आलेल्या **७३०.९४ चौ.मी.** बांधकाम क्षेत्र हस्तांतरीत करण्यात येत आहे. सोबत एकपक्षीय मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र जारी करीत आहे.

सदरचे आदेश आज दिनांक **१२/०४/२०२६** रोजी माझ्या सहीशिक्यानिशी दिले असे.

सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर, पुणे
सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन

{संजय राऊत}
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
पुणे शहर,पुणे.

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांचे विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (४) अन्वये मानीवहस्तांतरण प्रमाणपत्र.

मानीव हस्तांतरण अर्ज क्र.४६२/२०२३

-:प्रमाणपत्र:-

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांचे विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचेत नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (४) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार व मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील रिट पिटीशन क्रं. ५६६/२०२६ मधील दिनांक १७/०३/२०२६ रोजीचे आदेशानुसार व पुणे महानगरपालिकेचे दिनांक **१४/०९/१९८८** चे मंजूर नकाशानुसार मी, **संजय राऊत,** सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर,पुणे, प्रमाणित करतो की, **राधा वल्लभ सहकारी गृहरचना संस्था मर्या.**,ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे **नोंदणी क्र. पीएनए/पीएनए(१)/एचएसजी/(टिसी)/११७२६/सन २०१२-२०१३, दिनांक २५/०४/२०१२** अन्वये नोंदविण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नांवे सिटीएस.नं.३९७,नारायण पेठ,पुणे-३० मधील **एकुण क्षेत्रफळ** ३६७.८४ **चौ.मी. पैकी ३२०.९९ चौ.मी.** इतके क्षेत्रफळ व या जमिनीमध्ये बांधण्यात आलेल्या **७३०.९४ चौ.मी.** बांधकाम क्षेत्र असलेल्या इमारतीसह प्रर्वतंकाचे हक्क, मालकी हक्क व हितसंबंध यांचे **राधा वल्लभ सहकारी गृहरचना संस्था मर्या.**, या अर्जदारांच्या नांवे **'मानीव अभिहस्तांतरण'** म्हणुन अभिहस्तांतरण करणाऱ्या अभिहस्तांतरण विलेखाचे एकपक्षीय निष्पादन करण्यासाठी हे प्रकरण अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन योग्य असल्याचे प्रमाणित करुन खालील अटि व शर्तीवर सदरचे प्रमाणपत्र देत आहे.

१. सदरचे प्रमाणपत्र हे संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्राआधारे व मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील रिट पिटीशन क्रं. ५६६/२०२६ मधील दिनांक १७/०३/२०२६ रोजीचे आदेशानुसार देण्यात आले आहे. याव्दारे हस्तांतरीत होणाऱ्या जागेमध्ये व बांधकामामध्ये काही अनियमीतता असल्यास, ते याव्दारे नियमानुकुल केले आहे, असे समजण्यात येवु नये.
२. या प्रमाणपत्राव्दारे हस्तांतरीत होणाऱ्या जमिन व बांधकाम क्षेत्रापोटी आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क भरणे संबंधितांना बंधनकारक राहील.

(संजय राऊत)
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,
पुणे शहर,पुणे.

जा.क्र.जिउनि/पुणेशहर/गृहनि/मानीवहस्तांतरण/सन२०२६/2958
दिनांक:- १८/०४/२०२६